
Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# बालबोध पाठमाला

भाग 1

मराठी





Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

( भगवान महावीर 26 सौ वाँ जन्म-जयन्ती वर्ष )

# बालबोध पाठमाला भाग-१

( मूळ हिंदीचा मराठी अनुवाद )

लेखक :

**पण्डित रतनचन्द भारिल्ल**

शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न, एम०ए०, बी०एड०

प्राचार्य, श्री टोडरमल दिग. जैन सिद्धान्त महाविद्यालय

ए-4, बापूनगर, जयपूर-302015

संपादक :

**डॉ० हुकमचन्द भारिल्ल**

शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न एम०ए०, पीएच०डी०

संयुक्तमंत्री, श्री टोडरमल स्मारक भवन, जयपूर

प्रकाशक :

**पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट**

ए-4, बापूनगर, जयपुर-302015

फोन : (0141) 515458, 515581, फैक्स : 517977

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

मराठी :

| | | |
|---|---|---|
| प्रथम सात संस्करण (1972 से अद्यतन) | : | 29 हजार 300 |
| आठवाँ संस्करण (27 मई 2001, श्रुत पंचमी) | : | 3 हजार |
| गुजराती : पाँच संस्करण | : | 15 हजार |
| हिन्दी : इक्तीस संस्करण | : | 2 लाख 87 हजार 200 |
| कन्नड़ : तीन संस्करण | : | 5 हजार |
| तमिल : दो संस्करण | : | 3 हजार 500 |
| बंगला : प्रथम संस्करण | : | 1 हजार |
| अंग्रेजी : दो संस्करण | : | 8 हजार 200 |
| योग | : | 3 लाख 52 हजार 200 |

मूल्य : दो रुपया

## विषय-सूची


| क्रम | पाठाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| 1. | णमोकार मंत्र | 3 |
| 2. | चार मंगल | 6 |
| 3. | तीर्थंकर भगवान | 8 |
| 4. | देव दर्शन | 11 |
| 5. | जीव-अजीव | 14 |
| 6. | दिनचर्या | 17 |
| 7. | भगवान आदिनाथ | 20 |
| 8. | मेरा धाम | 24 |


मुद्रक :
सन् एन सन् क्रियेशन्स
तिलकनगर, जयपुर

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

## Thanks & Our Request

This shastra has been kindly donated by Dakshaben Sanghvi, Geneva, Switzerland who has paid for it to be "electronised" and made available on the internet.

Our request to you:

1) Great care has been taken to ensure this electronic version of BalbodhPathmala – Part 1 (Marathi) is a faithful copy of the paper version. However if you find any errors please inform us on rajesh@AtmaDharma.com so that we can make this beautiful work even more accurate.

2) Keep checking the version number of the on-line shastra so that if corrections have been made you can replace your copy with the corrected one.

## Version History

| Version Number | Date | Changes |
|---|---|---|
| 001 | 7 May 2008 | First electronic version |

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ पहिला

# णमोकार मंत्र

( गाथा )

**णमो अरिहंताणं, णमो सिद्धाणं, णमो आयरियाणं।**
**णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्व साहूणं॥**

( षट्खंडागम, गाथा १ )


लोकातील सर्व अरिहंतांना नमस्कार असो, सर्व सिद्धांना नमस्कार असो, सर्व आचार्यांना नमस्कार असो, सर्व उपाध्यायांना नमस्कार असो आणि सर्व साधूना नमस्कार असो.

## णमोकार मंत्राचे महात्म्य

**एसो पंच णमोयारो सव्वपावप्पणासणो।**
**मंगलेसु य सव्वेसु पढमं होइ मंगलं॥**

( मूलाचार अ. ७ – १८ )

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com



अरिहंत परमेष्ठी



सिद्ध परमेष्ठी



आचार्य परमेष्ठी



उपाध्याय परमेष्ठी



साधू परमेष्ठी

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



हा पंच नमस्कार मंत्र सर्व पापांचा नाश करणारा आहे, तसेच सर्व मंगलामध्ये प्रथम श्रेष्ठ मंगल आहे.

हा मंत्र मोह-राग-द्वेषाचा अभाव करणारा आहे आणि सम्यग्ज्ञान प्राप्त करविणारा आहे.

अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि साधु – ह्या पाचांना परमेष्ठी म्हणतात. जो जीव या पंच परमेष्ठींना ओळखून त्यांनी दाखविलेल्या मार्गाने जातो, त्याला खऱ्या सुखाची प्राप्ती होते.

**प्रश्न :–**

१. णमोकार मंत्र म्हणा ?
२. या मंत्रात कोणास नमस्कार केला आहे ?
३. या मंत्राच्या स्मरणाने काय फायदा होतो ?
४. पंच परमेष्ठींची नावे सांगा ?
५. खरे सुख कसे प्राप्त होते ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ दुसरा

# चार मंगल

**चत्तारि मंगलं, अरिहंता मंगलं, सिद्धा मंगलं, साहू मंगलं, केवलिपण्णत्तो धम्मो मंगलं ।**

**चत्तारि लोगुत्तमा, अरिहंता लोगुत्तमा, सिद्धा लोगुत्तमा, साहू लोगुत्तमा, केवलीपण्णत्तो धम्मो लोगुत्तमो ।**

**चत्तारि शरणं पव्वज्जामि, अरिहंते शरणं पव्वज्जामि, सिद्धे शरणं पव्वज्जामि, साहू शरणं पव्वज्जामि, केवलिपण्णत्तं धम्मं शरणं पव्वज्जामि ।**

या तीन लोकात चार मंगल आहेत. अरिहंत भगवान मंगल आहेत, सिद्ध भगवान मंगल आहेत, साधु (आचार्य, उपाध्याय व साधु) मंगल आहेत, तसेच केवली भगवंतांनी सांगितलेला वीतराग-धर्म मंगल आहे.

जे मोह-राग-द्वेषरूपी पापांचा नाश करते, खरे सुख उत्पन्न करते, त्यास मंगल म्हणतात. अरिहंतादिक स्वयं मंगलमय आहेत. त्यांच्या भक्तीने जीवांचे परम मंगल होते.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



या तीन लोकात चार उत्तम आहे. अरिहंत भगवान उत्तम आहेत, सिद्ध भगवान उत्तम आहेत, साधु (आचार्य, उपाध्याय व साधु) उत्तम आहेत, त्याच प्रमाणे केवली भगवंतांनी सांगितलेला वीतराग-धर्म उत्तम आहे.

तीन लोकात जे सर्वांपेक्षा महान् (श्रेष्ठ) आहेत, त्यांना उत्तम म्हणतात. लोकात हे चार सर्वांपेक्षा महान् आहेत, म्हणून उत्तम आहेत.

मी चौघांना शरण जातो. मी अरिहंत भगवंतांना शरण जातो, मी सिद्ध भगवंतांना शरण जातो, मी साधूंना (आचार्य, उपाध्याय, साधूंना) शरण जातो तसेच केवली भगवंतांनी सांगितलेल्या वीतराग-धर्मास शरण जातो.

शरण आश्रयाला म्हणतात. पंच परमेष्ठींनी सांगितलेल्या मार्गाने जाऊन स्वतःच्या आत्म्याचा आश्रय घेणे, म्हणजेच पंच परमेष्ठींना शरण जाणे होय.

जो पंच परमेष्ठींना शरण जातो, त्याचे कल्याण होते अर्थात् दुःख (भव-भ्रमण) नाहीसे होते.

प्रश्न :–

१. मंगल, उत्तम व शरण या शब्दांचा अर्थ सांगा.
२. आम्हीं कोणास शरण जावयास पाहिजे ?
३. आत्महित कशात आहे ?
४. 'चत्तारि मंगलं' आदि पाठ शुद्ध म्हणा.
५. पंचपरमेष्ठींना शरण जाणे – याचा अर्थ काय आहे ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ तिसरा

# तीर्थंकर भगवान

**विद्यार्थी** – गुरुजी ! बाहुबली स्वामी भगवान नाहीत काय ?

**गुरुजी** – का बरे ?

**विद्यार्थी** – चोवीस भगवंतांच्या नावामध्ये तर त्यांचे नाव येत नाही

**गुरुजी** – चोवीस तर तीर्थंकर असतात; परंतु जे जे वीतरागी आणि सर्वज्ञ आहेत, ते ते सर्व भगवान आहेत. सर्व अरिहंत परमेष्ठी आणि सर्व सिद्ध परमेष्ठी भगवानच आहेत.

**विद्यार्थी** – तीर्थंकर हे भगवान नाहीत काय ?

**गुरुजी** – जे तीर्थंकर आहेत ते, तर भगवान आहेतच; तसेच जे तीर्थंकर नाहीत, परंतु वीतराग व पूर्णज्ञानी आहेत ते सर्व अरिहंत आणि सिद्ध सुद्धा भगवानच आहेत.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**विद्यार्थी** – तर मग तीर्थंकर कोणास म्हणतात ?

**गुरुजी** – जे धर्मतीर्थाचा ( मोक्षमार्गाचा ) उपदेश देतात, समवशरण आदी विभूतीने सहित असतात आणि ज्यांना तीर्थंकर नामकर्म नावाच्या महान् पुण्याचा उदय असतो त्यांना तीर्थंकर म्हणतात, ते चोवीस आहेत.

**विद्यार्थी** – कृपा करुन चोवीस तीर्थंकराची नावे सांगा

**गुरुजी** –

| | |
|---|---|
| १. ऋषभदेव (आदिनाथ) | १३. विमलनाथ |
| २. अजितनाथ | १४. अनंतनाथ |
| ३. संभवनाथ | १५. धर्मनाथ |
| ४. अभिनन्दन | १६. शान्तिनाथ |
| ५. सुमतिनाथ | १७. कुन्थुनाथ |
| ६. पद्मप्रभ | १८. अरनाथ |
| ७. सुपार्श्वनाथ | १९. मल्लिनाथ |
| ८. चन्द्रप्रभ | २०. मुनिसुव्रत |
| ९. पुष्पदन्त (सुविधिनाथ) | २१. नमिनाथ |
| १०. शीतलनाथ | २२. नेमिनाथ |
| ११. श्रेयांसनाथ | २३. पार्श्वनाथ |
| १२. वासुपूज्य | २४. महावीर (वर्धमान, वीर, अतिवीर, सन्मति) |

**विद्यार्थी** – ही नावे तर लक्षाच राहणे कठीण आहे.

**गुरुजी** – कठीण नाही. मी तुम्हाला एक छन्द म्हणून दाखवितो. तो पाठ करा म्हणजे लक्षात ठेवणे सोपे जाईल.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



छंद :–

ऋषभ[1] अजित[2] संभव[3] अभिनंदन[4],
सुमति[5] पदम[6] सुपार्श्व[7] जिनराय।
चंद्र[8] पुहुप[9] शीतल[10] श्रेयांस[11] जिन,
वासुपूज्य[12] पूजित सुरराय॥
विमल[13] अनन्त[14] धर्म[15] जस उज्ज्वल,
शान्ति[16] कुंथु[17] अर[18] मल्लि[19] मनाय।
मुनिसुव्रत[20] नमि[21] नेमि[22] पार्श्व[23] प्रभु,
वर्धमान[24] पद पुष्प चढाय॥

**विद्यार्थी** – यांना जाणल्याने काय लाभ होतो ?

**गुरुजी** – यांचा उपदेश समजून त्याप्रमाणे वागलो तर आपण देखील भगवान बनू शकतो. हा मोठा लाभ आहे.

^^^०^^^

प्रश्न :–

१. भगवान कोणास म्हणतात ?
२. तीर्थंकर कोणास म्हणतात ?
३. तीर्थंकर आणि भगवान यांच्यामध्ये काय अंतर आहे ? प्रत्येक भगवान तीर्थंकर असतात काय ?
४. तीर्थंकर किती आहेत ? त्यांची नावे सांगा.
५. भगवान देखील चोवीसच असतात काय ?
६. पहिल्या, पाचव्या, आठव्या, तेराव्या, सोळाव्या, वीसाव्या, बावीसाव्या आणि चोवीसाव्या तीर्थंकरांची नावे सांगा.
७. एकापेक्षा अधिक नावे कोण-कोणत्या तीर्थंकरांना आहेत ? नावासहित सांगा.

१–२४ :– चोवीस तीर्थंकरांची नावे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

## पाठ चवथा

# देव-दर्शन

**दिनेश** – जिनेश ! अहो जिनेश !! कोठे चाललात ?

**जिनेश** – जिनमंदिराला.

**दिनेश** – का बरं ?

**जिनेश** – जिनेन्द्र भगवंतांचे दर्शन करण्यासाठी.

**दिनेश** – छान ! मी पण येतो !

**जिनेश** – फारच छान ! चला की ! प्रथम हा कातड्याचा पट्टा (बेल्ट) घरी काढून ठेवावा. आपणाला एवढे माहित असावे की कातड्याच्या वस्तू घेऊन मंदिरास जाऊ नय.

**दिनेश** – बरोबर ! मी आताच काढून येतो.

(दोघेही मंदिराला पोहोचतात)


**जिनेश** – अहो भाऊसाहेब ! चाललात कोठे ? जोडे तर येथे काढून ठेवा. मंदिरामध्ये जोडे, चप्पल घालून जात नसतात. तुम्ही याचे अगोदर कधी मंदिराला आले नाही, असे दिसते. म्हणूनच दर्शन करण्याचा विधी देखील माहित नाही.

**दिनेश** – खरंच ! भाऊसाहेब, माहित नाही, आपणच सांगा ना !

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates





**जिनेश** – ऐका ! मंदिराच्या दरवाजाजवळ पाणी ठेवलेले असते, सर्वप्रथम जोडे चप्पल काढून पाण्याने हात-पाय धूऊन नंतर भगवंताचा जय-जयकार करीता तसेच तीन वेळा नि:सहि नि:सहि नि:सहि म्हणत मंदिरात प्रवेश करावा.

**दिनेश** – 'नि:सहि'चा काय अर्थ होतो ?

**जिनेश** – 'नि:सहि'चा अर्थ आहे – सर्व सांसारिक कामांचा निषेध, सारांश असा की संसारातील सर्व कामांची चिंता सोडून मंदिरात प्रवेश करावा.

**दिनेश** – पुढे काय करावे ?

**जिनेश** – नंतर भगवंतांच्या वेदीसमोर 'ॐ जय जय जय नमोऽस्तु नमोऽस्तु नमोऽस्तु, णमो अरिहंताणं' आदी णमोकार मंत्र तसेच 'चत्तारि मंगलं' आदी मंगल पाठ म्हणत म्हणत जिनेंद्र भगवंतांना अष्टांग नमस्कार करावा. त्यानंतर मन एकाग्र करुन भगवंतांची स्तुती

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



म्हणत तीन तीन प्रदक्षिणा घ्याव्यात, त्यानंतर पुन्हा भगवंतांना नमस्कार करुन नऊ वेळा णमोकार मंत्र म्हणत कार्योत्सर्ग करावा.

**दिनेश** – अगदी बरोबर! शांतिपूर्वक भगवंतांचे दर्शन एकाग्र चित्ताने केले पाहिजे, आणखी ?

**जिनेश** – आणखी काय ? त्यानंतर शांत बसून कमीत कमी अर्धा तास तरी शास्त्र वाचन करावयास पाहिजे. जर त्यावेळी मंदिरात प्रवचन चालू असेल तर तेही ऐकले पाहिजे.

**दिनेश** – एवढेच ना !

**जिनेश** – एवढेच काय ? जे शास्त्रात वाचले असेल अथवा प्रवचनात ऐकले असेल, त्याचे थोडा वेळ बसून मनन करावयास पाहिजे. तसेच मी कोण आहे ? भगवान कोण आहेत ? मी स्वतः भगवान कसा बनू शकतो इत्यादि संबंधी विचार करावयास पाहिजे.

**दिनेश** – या सर्व गोष्टींपासून लाभ काय ?

**जिनेश** – यामुळे आत्म्यात शांती प्रगट होते. परिणामामध्ये निर्मलता येते. मंदिरात आत्म्याची चर्चा होत असते. आत्मस्वरूप समजून घेऊन जर आम्ही आत्मस्वरूपात लीन होऊ तर परमात्मा बनू शकू !

**प्रश्न :–**

१. देवदर्शनाचा विधी आपल्या शब्दात सांगा ?
२. मंदिरात कसे व का जावयास पाहिजे ?
३. मंदिरात काणकोणत्या वस्तु नेऊ नयेत ?
४. देवदर्शन करताना काय म्हटले पाहिजे ?
५. मंदिरात काय काय करावयास पाहिजे ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ पाचवा

# जीव–अजीव

**हिरालाल** – माझे नाव किती छान आहे !

**ज्ञानचंद** – अहा ! फारच छान आहे, अहो भाऊ ! हिरा मूल्यवान तर खराच, परन्तु आहे तर अजीवच ना ? म्हणजे काय तुम्ही जीवाचे (चेतनचे) अजीव बनणे पसंत करता ?

**हिरालाल** – अहो भाऊ ! हे जीव-अजीव काय आहेत ?

**ज्ञानचंद** – जीव ! तुम्ही जीवाला जाणत नाही काय ? तुम्ही जीवच तर आहात. जो ज्ञाता-दृष्टा आहे, तोच जीव आहे. जो जाणतो, ज्यामध्ये ज्ञान आहे, तोच जीव आहे.

**हिरालाल** – आणि अजीव ?

**ज्ञानचंद** – ज्यामध्ये ज्ञान नाही, जो जाणू शकत नाही, तोच अजीव होय. आम्ही तुम्ही जाणतो, म्हणून जीव आहोत. हिरा, सोने, चांदी, टेबल, खुर्ची जाणत नाहीत; म्हणून ते अजीव आहेत.

**हिरालाल** – जीव-अजीव यांची आणखी काय ओळख आहे ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**ज्ञानचंद** – जीव सुख-दुःखाचा अनुभव करतो, अजीवाला सुख-दु:ख होत नाही. आम्ही तुम्ही सुख-दुःखाचा अनुभव करतो, म्हणून जीव आहोत. टेबल, खुर्ची सुख-दु:खाचा अनुभव करीत नाहीत, म्हणून अजीव आहेत.



हे (टेबल आणि शरीर) अजीव आहेत.

**हिरालाल** – डोळे पाहतात, कान एकतात, शरीरास सुख-दु:ख होते; मग आमचे शरीर तर जीव आहे ना ?

**ज्ञानचंद** – असे नाही भाऊ! डोळा थोडेच पाहतो, कान थोडेच ऐकतात, पाहणारा-ऐकणारा यांच्याहून वेगळाच कोणी जीव (आत्मा) आहे. जर डोळा पाहतो व कान ऐकतो तर प्रेताला (मृत शरीराला) देखील पाहता व ऐकता आले पाहिजे. म्हणूनच म्हटले आहे की शरीर अजीव आहे. डोळा व कान वगैरे शरीराचेच भाग आहेत, म्हणून ते देखील अजीव आहेत.

**हिरालाल** – छान! भाऊ ज्ञानचंद, आता मला समजले की :–

मी जीव आहे,



मी जीव आहे.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



शरीर अजीव आहे.
माझ्यात ज्ञान आहे.
शरीरात ज्ञान नाही.
मी जाणतो.
शरीर काही जाणत नाही

**ज्ञानचंद** – समजलं तर सांगा पाहू, हत्ती जीव आहे की अजीव?

**हिरालाल** – जसे आमचे शरीर अजीव आहे, तसेच हत्ती वगैरे सर्व जीवांचे शरीर देखील अजीव आहे, परंतु त्यांचा आत्मा मात्र जीवच आहे.

हे तर समजले, परंतु असे जाणल्यापासून लाभ काय? हे ही तर सांगा.

**ज्ञानचंद** – हे जाणल्याशिवाय आत्म्याची खरी ओळख होऊ शकत नाही. आणि आत्म्याला ओळखल्याशिवाय खरे सुख मिळू शकत नाही, आम्हाला तर सुखी व्हावयाचे आहे, म्हणून त्यांचे ज्ञान करुन घेणे देखील आवश्यक आहे.

जीव–अजीवाचे ज्ञान करुन आम्ही स्वतः भगवान बनू शकतो.

**प्रश्न :–**

१. जीव कोणाला म्हणतात ?
२. अजीव कोणाला म्हणतात.
३. खाली लिहिलेल्या वस्तुमधून जीव–अजीव ओळखा :–
हत्ती, तुम्ही, खुर्ची, घर, आगगाडी, कान, डोळा, भाकर, विमान, हवा, अग्नी.
४. जीव–अजीवाची ओळख झाल्यापासून काय लाभ होतो ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ सहावा

# दिनचर्या

**गुरुजी** – मुलांनो ! आज मी तुमचे नख व दात पाहणार आहे. ठीक, रमेश ! बोला – तुम्ही किती दिवसापासून स्नान केले नाही ?

**रमेश** – गुरुजी ! मी तर रोज स्नान करतो.

**गुरुजी** – दररोज स्नान करणाऱ्याचे हात-पाय एवढे अस्वच्छ नसतात. तुम्ही रोज स्नान करीत असाल – हे शक्य आहे, पण दोन तांबे पाणी डोक्यावर घेणे म्हणजे स्नान करने नव्हे. आम्ही चांगल्या रीतीने घासून स्नान केले पाहिजे.

याचप्रमाणे आपले दात स्वच्छ करण्यासाठी दररोज सकाळी आम्ही दात घासले पाहिजे. जी मुले दात घासत नाहीत, त्यांच्या तोंडाची दुर्गंधी येत असते. त्यांचे दात कमजोर होतात आणि लवकर पडतात.



**सुरेश** – गुरुजी ! मी तर संध्याकाळी स्नान करीत असतो।

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**गुरुजी** – नाही, आम्ही प्रत्येक काम वेळेवर करावयास पाहिजे, तरच ते योग्य आहे. दररोजची दिनचर्या आम्ही तयार करावयास हवी. आणि मग त्याप्रमाणे दैनिक कार्य करावयास पाहिजे.

**रमेश** – गुरुजी आमची दिनचर्या आपणच तयार करुन द्या. आम्ही आजपासून त्या दिनचर्येला अनुसरुन कार्य करू.

**गुरुजी** – प्रत्येक मुलाने सुर्योदय होण्याचे अगोदर उठावयास हवे. सर्वप्रथम णमोकार मंत्राचा ९ वेळा जप करावा नंतर थोडावेळ आत्मस्वरूपाचा विचार करुन मनाला शुद्ध करावे.

**सुरेश** – मन देखील अशुद्ध होत असते काय ?

**गुरुजी** – होय बाळ ! ज्याप्रमाणे बाहेरची घाण आमच्या शरिरास मलीन करते, त्याप्रमाणे मोह-राग-द्वेष आदि विकारी भावांमुळे आमचे मन (आत्मा) मलीन होते. ज्याप्रमाणे स्नान, दात घासणे आदी द्वारे आमचे शरीर स्वच्छ होते. त्याप्रमाणे आत्मा व परमात्मा यांच्या चिंतनाने आमचे मन (आत्मा) पवित्र होते



आम्हास अंतरग व बहिरंग अशा दोन्ही पवित्रतेकडे लक्ष द्यावयास पाहिजे.

**रमेश** – त्यानंतर ?

**गुरुजी** – त्यानंतर शौच (संडास) वगैरे उरकून दात घासून स्नान करावे तसेच

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



शुद्ध व स्वच्छ धुतलेले कपडे नेसून मंदिरात देव-दर्शनासाठी जावे.

देव-दर्शनाची विधी तर तुम्हास त्या दिवशी सांगितलाच आहे. त्यानंतरच अल्पाहार (दूध, फराळ) घेऊन शाळेची वेळ झाली असेल तर तेथे जावयास पाहिजे, नाही तर घरीच स्वतः अभ्यास करावयास पाहिजे.

याचप्रमाणे जेवण देखील दररोज यथासमय १०–११ वाजता मन शांत ठेवून करावयास पाहिजे. संध्याकाळी सूर्यास्ताचे अगोदर जेवण उरकणे – हे प्रत्येक मुलाचे कर्तव्य आहे. रात्री भोजन कधीच करावयास नको, याचप्रमाणे रात्रीला देखील जो पर्यंत मन लागेल तो पर्यंत (८–९ वाजेपर्यंत) आपला अभ्यास करावयास पाहिजे. त्यानंतर आत्मा व परमात्म्याचे स्मरण करीत स्वच्छ व साफ अंथरुणावर स्वस्थपणे झोपावयास पाहिजे.

**सर्व मुले** – आजपासून आम्ही आपण सांगितलेल्या दिनचर्यैला अनुसरुनच वागू आणि शरीराच्या स्वच्छतेबरोबरच आत्म्याच्या पवित्रतेकडेही लक्ष देऊ.

~~~o~~~

**प्रश्न :–**

१. चांगल्या मुलाची दिनचर्या कशी असावयास पाहिजे ?
२. सकाळी उठून सर्वात प्रथम आम्हास काय करावयास पाहिजे ?
३. शारीरिक स्वच्छता व मनाची पवित्रता म्हणजे काय ?
४. शारीरिक स्वच्छतेसाठी काय-काय करावयास पाहिजे ?
५. मानसिक (आत्मिक) पवित्रतेसाठी काय करावयास पाहिजे ?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com
~~~

## पाठ सातवा

# भगवान आदिनाथ

**मुलगी** – आई, चल ना घरी !

**आई** – येते बाळ ! एवढे भक्तामर म्हणते व येते !

**मुलगी** – भक्तामर काय आहे ?

**आई** – भक्तामर स्तोत्र एका स्तुतीचे नाव आहे. त्यात भगवान आदिनाथांची स्तुती (भक्ती) केली आहे.

**मुलगी** – आई ! आदिनाथ कोण होते की ज्यांची स्तुती हजारो लोक दररोज करतात ?

**आई** – ते भगवान होते. ते जगातील सर्व गोष्टींना जाणत होते. तसेच त्यांचे मोह-राग-द्वेष नाहिसे झाले होते. म्हणून ते परम सुखी होते.

**मुलगी** – ते जन्मतःच वीतराग आणि सर्वज्ञ होते काय ? त्यांचा जन्म कोठे झाला होता ?

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



**आई** – नाही बाळ ! त्यांनी वीतरागता आणि सर्वज्ञता पुरुषार्थाने प्राप्त केली होती. त्यांचा जन्म अयोध्या नगरीमध्ये राजा नाभिरायाची राणी मरुदेवीच्या पोटी झाला होता.

**मुलगी** – ते तर राजकुमार होते, त्यांनी राज्य केले नाही काय ?

**आई** – राज्य केले, लग्न पण केले होते. त्यांची दोन लग्ने झाली होती. पहिल्या पत्नीचे नाव नंदा असे होते. हिच्यापासून भरत चक्रवर्ती आदी शंभर पुत्र आणि ब्राह्मी नावाची कन्या झाली होती. दुसऱ्या पत्नीचे नाव सुनंदा असे होते. हिच्यापासून बाहुबली हा पुत्र आणि सुंदरी नावाची कन्या झाली होती.

**मुलगी** – काय ? भरत चक्रवर्ती आणि बाहुबली हे भगवान आदिनाथांचे पुत्र होते ?

**आई** – भगवान तर ते नंतर बनले. अगोदर त्यांचे नाव राजा ऋषभदेव असे होते. ते पहिले तीर्थंकर भगवान असल्यामुळे त्यांना आदिनाथ देखील म्हणू लागले.

एके दिवशी राजा ऋषभदेव आपल्या दरबारात बसून नीलांजनेचे नृत्य पाहात होते. नृत्य करीत असतानाच नीलांजनेचा मृत्यू झाला. हे पाहून संसाराची क्षणभंगुरता त्यांच्या लक्षात आली आणि राज्य वगैरे सर्वांचा राग सोडून ते दिगंबर मुनि बनले. सहा महिने तर आत्मध्यानात मग्न राहिले. त्यानंतर लोकांना आहारदान विधी माहीत नसल्यामुळे सहा महिनेपर्यंत त्यांना आहार मिळाला नाही.

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates





एक वर्षानंतर अक्षयतृतीयेच्या दिवशी सर्व प्रथम ऋषभ मुनींचा राजा श्रेयांसच्या घरी इक्षु-रसाचा ( ऊसाच्या रसाचा ) आहार झाला. त्याच दिवसापासून **'अक्षयतृतीया'** हा पर्व सुरू झाला.

**मुलगी** – ते मुनी झाल्याबरोबरच सर्वज्ञ झाले होते काय ?

**आई** – नाही बाळ ! एक हजार वर्षपर्यंत अखंडपणे मौन राहून ते आत्मसाधना करीत राहिले. एके दिवशी आत्मतल्लीनतेच्या अवस्थेत त्यांना केवलज्ञानाची

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



प्राप्ती झाली. आणि ते वीतराग - सर्वज्ञ भगवान बनले. तसेच त्यांच्या दिव्यध्वनी द्वारे तत्त्वोपदेश होऊ लागला, यामुळे भव्य जीवांना मुक्तीच्या मार्गाचे ज्ञान झाले.

**मुलगी** – ओ हो! तू त्यांचीच स्तुती करीत आहेस काय? मी पण करीत जाईन! ते मलादेखील मुक्तीच्या मार्ग दाखवतील काय?

**आई** – बाळ! अवश्य करीत जा! ते तर काही दिवसानंतर मुक्त झाले अर्थात् धर्मसभा (समवशरण) इत्यादी सोडून सिद्ध झाले. तथापि त्यांनी सांगितलेला मुक्तिमार्ग ज्ञानी लोकांच्या द्वारे आजपर्यंत आम्हाला उपलब्ध आहे आणि जे त्यांनी सांगितलेल्या मुक्ति-मार्गाने जातात तेच त्यांचे खरे भक्त होते. तसेच ते स्वतः देखील भगवान बनू शकतात.

**प्रश्न :–**

१. भक्तामर स्तोत्रात कोणाची स्तुती आहे?
२. भगवान आदिनाथांचा थोडक्यात परिचय द्या?
३. अक्षयतृतीया पर्वासंबंधी तुम्हास काय माहिती आहे?
४. राजा ऋषभदेव भगवान आदिनाथ कसे झाले?. तसेच त्यांना आदिनाथ का म्हणतात?
५. त्यांना वैराग्य का झाले?
६. त्यांनी सांगितलेला मुक्तीमार्ग आम्ही प्राप्त करु शकतो काय? जर होय तर कसा?

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

पाठ आठवा

# मेरा धाम

शुद्धातम है मेरा नाम,
मात्र जानना मेरा काम।
मुक्तिपुरी है मेरा धाम[1]
मिलता जहाँ पूर्ण विश्राम ॥

जहाँ भूख का नाम नहीं है,
जहाँ प्यास का काम नहीं है।
खाँसी और जुखाम नहीं है,
आधि[2] व्याधि[3] का नाम नहीं है ॥

सत्[4] शिव[5] सुन्दर मेरा धाम,
शुद्धातम है मेरा नाम।
मात्र जानना मेरा काम ॥१॥

स्व-पर-भेद विज्ञान करेंगे,
निज आतम का ध्यान धरेंगे।
राग-द्वेष का त्याग करेंगे,
चिदानन्द[6] रस पान करेंगे ॥

सब सुख दाता मेरा धाम,
शुद्धातम है मेरा नाम।
मात्र जानना मेरा काम ॥२॥

---

१. निवास. २. मानसिक रोग. ३. शारीरिक रोग
४. खरा. ५. कल्याणकारी. ६. आत्म्याचा आनन्द